| | |
|---|---|
| Client: Kohinoor Hospital | Date : 1st March, 13 |
| Publications : Lokmat | Page No: 8 |
| Edition/City : | Media Evaluation: |



“ लघुउद्योग क्षेत्रासाठीही यंदाच्या अर्थसंकल्पात विशेष तरतूद नाही. परिणामी, ग्रामीण भाग, आदिवासी पाडे आणि तळागाळातील लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी या क्षेत्रासाठी काही योजना आखणे अपेक्षित होते.

■ संजीव पेंढारकर, विको (चेअरमन)

देशातल्या आरोग्य क्षेत्राची फारशी काही प्रगती झालेली नसतानाच यासाठी फारशी तरतूद केलेली नाही.

■ डॉ. राजीव बोधनकर, उपाध्यक्ष, कोहिनूर हॉस्पिटल

“ केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी अत्यंत संयमितपणे अर्थसंकल्प मांडला आहे. फार काही चांगला नाही आणि फार काही वाईट नाही, अशी अर्थसंकल्पाची व्याख्या करता येईल. तो प्रोत्साहित अथवा प्रेरित करणारा नाही.

■ दीपक घैसास, अध्यक्ष, जनकोव्हल

हे बजेट 'लॉंग टर्म' आहे. अर्थसंकल्पात आगामी लोकसभा निवडणुकीचा विचार करण्यात आला आहे.

■ सुधीर मुतालिक, पॉझिटिव्ह मेटरिंग पंप्स

“ श्रीमंत अथवा मध्यमवर्गीयांना अर्थसंकल्पात फारसे स्थान देण्यात आले नसले तरी गरिबांचा प्रामुख्याने विचार करण्यात आला आहे. 'सरचार्ज' एक वर्षाकरिताच आकारण्यात येणार आहे.

■ सतीश जामदार, अध्यक्ष, सीआयआय, महाराष्ट्र

सिगारेटच्या उत्पादन शुल्कात झालेली वाढ ही स्वागतार्ह आहे. यंदा ६ टक्के वाढविण्यात आलेले उत्पादन शुल्क व्यसनमुक्ततेला प्रोत्साहन देणारे आहे.

■ देविका छडा, सलाम बॉम्बे फाउंडेशन

“ २०१४ सालच्या लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून दुर्बल घटकांवर अधिकाधिक लक्ष केंद्रित केले आहे. यात कोणालाही दुखावण्यात आलेले नाही किंवा कोणाला फारसे महत्त्व दिलेले नाही.

■ निनाद कर्पे, उपाध्यक्ष, सीआयआय